दैनिक

● संपूर्ण ठाणे जिल्ह्यासह मुंबई, नवी मुंबई, पालघर रायगडचे एकमेव दैनिक ●

# महाराष्ट्र जनमुद्रा

MAHMAR/2000/3093 ■ maharashtrajanmudra.com ■ janmudra_thane@yahoo.co.in ■ editer.deepakdalvi@gmail.com

■ वर्ष : २६ ■ अंक : २९० ■ ठाणे ■ गुरुवार, दिनांक ६ ऑगस्ट, २०२६ ■ पाने : ४ ■ किंमत : २ रुपये

संपादक : डॉ. दीपक महिपत दळवी

## गतिमान भूसंपादन करून औद्योगिक विकासाला चालना द्यावी – मुख्यमंत्री

### मुख्यमंत्र्यांकडून एमआयडीसीअंतर्गत प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा

**मुंबई :** राज्यामध्ये नवीन औद्योगिक वसाहतींचा विस्तार वेगाने होत आहे. या विस्तारातूनच औद्योगिक विकास होणार आहे. त्यामुळे उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. गतिमान भूसंपादन करून महाराष्ट्रात औद्योगिक विकासाला चालना द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एमआयडीसीअंतर्गत विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासंदर्भात आढावा बैठक वर्षा निवासस्थान येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, यांच्यासह संबंधित विविध वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, औद्योगिक भूखंड वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी 'मिलाप' या ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज, रिअल-टाईम ट्रॅकिंग, ऑफर लेटर आणि वाटप आदेशांचे स्वयंचलित वितरण; तसेच डॅशबोर्ड सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्यात १,१८३ औद्योगिक भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. त्यातून ५,५०२ कोटींचा महसूल प्राप्त झाला आहे.

राज्यात सध्या ६६ हजार ३४३ एकर जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, पुणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, नाशिक आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया सुरू आहे. राज्यातील ९७ सामंजस्य करारांतर्गत सुमारे ७५ हजार २३४ एकर जमिनीची मागणी आहे. त्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उच्चाधिकार समिती स्तरावरील मंजुरी, विविध प्रशासकीय टप्पे; तसेच वनविषयक परवानग्यांमुळे होणारा विलंब कमी करण्यासाठी प्रक्रिया अधिक सुलभ करावी. उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध व्हावी आणि गुंतवणूक प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी अनावश्यक प्रशासकीय टप्पे कमी करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

## वेचक

### रिंग मेट्रोबाबत सविस्तर माहितीसाठी नगरसेवकांची विशेष सभा घ्यावी : संजय वाघुले

**ठाणे :** ठाणे शहरातील प्रस्तावित रिंग मेट्रो संदर्भात नगरसेवक-नगरसेविकांना सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती देण्याबरोबरच शंकांचे निरसन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात विशेष सभा आयोजित करावी, अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे केली आहे. केंद्र सरकारच्या सहकार्याने ठाणे महापालिका क्षेत्रात सुमारे १२ हजार ५०० कोटी रुपये खर्चून रिंग मेट्रो उभारण्यात येणार आहे. या मेट्रोच्या मार्गाबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे. इतकेच नव्हे तर सर्वपक्षीय नगरसेवक-नगरसेविकांनाही रिंग मेट्रोच्या मार्गाबाबत माहिती नाही. नागरिकांच्या शंकांचे लोकप्रतिनिधीही निरसन करू शकत नाहीत, ही वस्तूस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींना सविस्तर माहिती देण्यासाठी महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात विशेष सभा आयोजित करावी. त्यात रिंग मेट्रो प्रकल्पाचा अंतिम आराखडा, प्रस्तावित स्थानके आणि मार्ग आदींबरोबरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ३ ऑगस्ट रोजी मुंबईत झालेल्या बैठकीतील सूचनांची सविस्तर माहिती द्यावी. या सभेला महामेट्रो व महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना बोलवावे, अशी मागणी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले यांनी केली आहे.

### ठाण्यात उच्चभ्रू सोसायटीत राहणाऱ्या ७७ वर्षीय महिलेचा २१ व्या मजल्यावरून पडून मृत्यू

**ठाणे :** माजिवडा येथील वसंत लॉन्स या उच्चभ्रू सोसायटीत राहणाऱ्या ७७ वर्षीय महिलेचा बुधवारी (५ ऑगस्ट २०२६) दुपारी २१ व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला. ही दुर्घटना आहे की हत्या की आत्महत्या या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. कुमुधा शेट्टी असे मृत महिलेचे नाव आहे. वर्तकनगर पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत. वसंत लॉन्समधील सवाना टॉवर या २३ मजली इमारतीत २१ व्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये कुमुधा शेट्टी वास्तव्यास होत्या. बुधवारी दुपारी सुमारे ३.४५ च्या सुमारास त्या सदनिकेच्या सज्जामधून दुसऱ्या मजल्यावरील पोडियमवरील भागात पडल्या. उंचावरून पडल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच वर्तनगर पोलिसांसह ठाणे अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले.

## वसंत डावखरे सीडी प्रकरणात उद्धव ठाकरेंचा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जबाब नोंदवला

### 6 ऑगस्टला एकनाथ शिंदेंचा जबाब; आनंद परांजपे यांचीही साक्ष होणार

**कल्याण :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिवंगत नेते वसंत डावखरे यांच्याशी संबंधित कथित सीडी प्रकरणात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा बुधवारी कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जबाब नोंदविण्यात आला. न्यायाधीश संतोष आगे यांच्या न्यायालयात हा जबाब नोंदविण्यात आला. याबाबतची माहिती अशोक जगदाळे यांनी दिली.

या प्रकरणात आता 6 ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जबाब नोंदविण्यात येणार आहे. तसेच माजी खासदार आनंद परांजपे यांचीही साक्ष नोंदविण्यात येणार आहे.

हे प्रकरण 2009च्या कल्याण लोकसभा निवडणुकीशी संबंधित आहे. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून वसंत डावखरे निवडणूक रिंगणात होते, तर शिवसेनेकडून आनंद परांजपे यांना उमेदवारी देण्यात आली होती. परांजपे यांच्या प्रचारासाठी कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी येथील पोटे मैदानावर आयोजित सभेत डावखरे यांची कथित सीडी दाखविण्यात आली होती.

या सीडीमध्ये एका खासगी बैठकीतील व्हिडिओ असून, त्यात डावखरे कार्यकर्त्यांना निवडणुकीत विजय मिळवून देण्याचे आवाहन करत असल्याचा आरोप करण्यात आला होता. सीडीच्या माध्यमातून डावखरे यांची बदनामी केल्याचा आरोप करत कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तत्कालीन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, तत्कालीन जिल्हाप्रमुख एकनाथ शिंदे, उमेदवार आनंद परांजपे आणि सभेचे आयोजक रमाकांत देवळेकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाची सुनावणी गेल्या सुमारे 17 वर्षांपासून कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात सुरू आहे. या प्रकरणातील तक्रारदार वसंत डावखरे यांचे निधन झाले आहे. दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणात आता प्रमुख राजकीय नेत्यांचे जबाब आणि साक्ष नोंदविण्यात येत असल्याने सुनावणीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

## अतिरिक्त आयुक्तपदावर मनिष जोशी, गजानन गोदेपुरे यांची नियमबाह्य शिफारस!

### भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक नारायण पवार यांची तक्रार

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदावर विद्यमान उपायुक्त मनिष जोशी व उपायुक्त गजानन गोदेपुरे यांची सर्वसाधारण सभेच्या ठरावातून करण्यात आलेली शिफारस नियमबाह्य आहे. या संदर्भात महापालिकेने केलेला ठराव रद्द करून राज्य सरकारच्या नियमानुसार प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे निवड करावी, अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक नारायण पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

ठाणे महापालिकेच्या २३ जून रोजीच्या सर्वसाधारण सभेत आयत्या वेळचे प्रकरण आणून घाईघाईत ठराव मंजूर करण्यात आला. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त या पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उप आयुक्त मनिष जोशी यांची प्राथम्य क्रम १ व उप आयुक्त गजानन गुरुपाद गोदेपुरे यांची प्राथम्य क्रम २ म्हणून नावे निश्चित करण्यात आली. ३१ जुलै २०२६ रोजी रिक्त होणाऱ्या अतिरिक्त आयुक्त पदावर १ ऑगस्ट २०२६ पासून मनिष जोशी यांच्या पदोन्नतीस मान्यता देण्यात यावी. तसेच मनिष जोशी यांच्या ३१ ऑगस्ट २०२६ रोजीच्या सेवानिवृत्तीनंतर प्राथम्य क्रम २ येथील गजानन गोदेपुरे यांची नियुक्ती करावी, असा उल्लेख होता. अतिरिक्त आयुक्त हे ठाणे महापालिकेतील महत्त्वाचे पद असून, हे रिक्त राहणे उचीत नाही. ही बाब विचारात घेता ३१ ऑगस्ट रोजी रिक्त होणाऱ्या पदावर गजानन गोदेपुरे यांची अतिरिक्त आयुक्त या पदावर पदोन्नती करण्याबाबतच्या प्रस्तावास महापालिका आयुक्त यांनी मान्यता दिली होती. सदर प्रस्ताव मान्यतेच्या पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविणेस सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे, असा उल्लेख ठरावात होता.

मात्र, संबंधित ठराव हा संशयास्पद असून, नगरसेवकांना माहिती न देताच घाईघाईत मंजूर करण्यात आला, असा आरोप नगरसेवक नारायण पवार यांनी केला. संबंधित ठरावाच्या प्रकरणाचा क्रमांक हा एकाच पानावर वेगवेगळा टाकण्यात आला होता. त्यात एकाच पानावर एका ठिकाणी प्रकरण क्र. ६८७ व दुसऱ्या ठिकाणी ठराव क्रमांक ७८७ असा उल्लेख होता, याकडे पवार यांनी लक्ष वेधले.

राज्य सरकारच्या शासन निर्णय क्रमांक : एमसीओ २०१५/प्र. क्र. २१८/नवि १४ दिनांक २५ जून २०१५ अनुसार महापालिकांमध्ये अतिरिक्त आयुक्तपदावर निवडीने नियुक्ती करावयाच्या प्रस्तावावर विचार करण्यास्तव नियमावली निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त पदावर निवडीने नियुक्तीसाठीचे प्रस्ताव विचारात घेण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष प्रधान सचिव (नगर विकास - २) असून, सदस्यपदी आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, ज्येष्ठतम महानगरपालिका आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून), संबंधित महानगरपालिका आयुक्त, उपसचिव, तर सदस्यपदी अवर सचिव यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती नारायण पवार यांनी दिली.

#### न्यायालयात आव्हानाबरोबरच महापालिकेच्या बदनामीची भीती

अतिरिक्त आयुक्तपदावरील बेकायदेशीर नियुक्तीमुळे संबंधित प्रकरणाला न्यायालयात आव्हान देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचबरोबर या प्रकरणामुळे महापालिकेची अनावश्यक बदनामी होऊ शकेल. महासभेला अतिरिक्त आयुक्त पदाच्या बढतीचा अधिकार नसल्याने महासभेवर ताशेरे ओढले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित ठराव हा विखंडित करावा. तसेच महापालिका संवर्गातून अतिरिक्त आयुक्त व उप आयुक्त पदावरील नियुक्तीसाठी नियमानुसार प्रक्रिया राबवावी, अशी मागणी नगरसेवक नारायण पवार यांनी केली आहे.

## भिवंडीतील खड्ड्यांचा कहर

## रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच रिक्षात गर्भवती महिलेची प्रसूती; आई-बाळ सुखरूप

**भिवंडी :** भिवंडी शहर परिसरात निकृष्ट पद्धतीने तयार करण्यात आलेले रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झाले आहे सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर ठेकेदारांने टाकलेला सर्व डांबर वाहून गेला असून फक्त खडी राहील आहे. जागोजागी रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहे त्यामुळे वाहतूक कोंडी व अपघात असे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, त्यामुळे नागरिक त्रस्त झालेल्या आहेत.

खराब व खड्डेमय रस्त्यांमुळे नागरिकांचे हाल होत असतानाच महापालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे आणखी एक धक्कादायक गंभीर प्रकार समोर आला आहे.प्रसूती वेदना सुरू झालेल्या



एका गर्भवती महिलेला रुग्णालयात नेत असताना रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे प्रवास लांबला आणि अखेर कल्याण नाका परिसरात रिक्षामध्येच सदर महिलेची प्रसूती झाली.सुदैवाने आई आणि नवजात बाळाची प्रकृती स्थिर असून या घटनेने शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, आई आणि बाळ दोघांचीही प्रकृती स्थिर आहे. या घटनेमुळे भिवंडी शहर आणि ग्रामीण भागातील रस्त्यांची अत्यंत बिकट अवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना रोजच जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अपघात,वाहतूक कोंडी आणि आता रुग्णालयात पोहोचण्यापूर्वी रिक्षातच झालेली प्रसूती या घटनांमुळे प्रशासनाच्या दुर्लक्षावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## मुंबई-ठाणे उपनगरीय रेल्वेतील गर्दी व सुरक्षेचा प्रश्न लोकसभेत

### १५ डब्यांची संख्या वाढवावी, सर्व लॉकलमध्ये सयंचलित दरवाजे बसवावे, स्थानकांवरील गर्दी व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कक्ष उभारावा

### खासदार नरेश म्हस्के यांची लोकसभेत मागणी

**नवी दिल्ली :** संसदीय कामकाजाच्या नियम ३७७ अंतर्गत खासदार नरेश म्हस्के यांनी मुंबई-ठाणे उपनगरीय रेल्वे नेटवर्कमधील वाढती गर्दी आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न लोकसभेत उपस्थित केला. रेल्वेमंत्र्यांनी या मानवी संकटाला सर्वोच्च प्राधान्य देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी केली.



**खासदार नरेश म्हस्के हे निवडून आल्यापासून मुंबई आणि ठाणे उपनगरीय प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी संसदेत आवाज उठवत आहेत. पावसाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून विरोधकांनी संसदेचे कामकाज गोंधळ घालून ठप्प केले आहे. आज खासदार नरेश म्हस्के यांना संसदेत बोलायची संधी मिळताच त्यांनी रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासावर आवाज उठविला.**

मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट (MUTP) अंतर्गत ५७ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक झालेली आहे. उपनगरीय रेल्वेच्या स्थितीत अजूनही सुधारणा करणे गरजेचे आहे. २०२४ मधील आकडेवारीनुसार अतिगर्दी, रेल्वे रुळ ओलांडणे आणि रेल्वेतून पडण्याच्या घटनांमुळे हजारो प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे. सध्या १२ डब्यांच्या लोकलमध्ये क्षमतेपेक्षा चारपट अधिक प्रवासी प्रवास करत असल्याने 'सुपर-डेन्स क्रश लोड'ची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, दरवाज्यांवर लटकून प्रवास करणे आणि अपघात होणे ही नियमित बाब बनली असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेच्या निदर्शनास आणून दिले.

संसदीय समित्या आणि न्यायालयांच्या स्पष्ट निर्देशांनंतरही १५ डब्यांच्या गाड्यांचा विस्तार, स्वयंचलित दरवाजे, फेन्सिंग आणि प्लॅटफॉर्मची उंची वाढविणे यांसारख्या मूलभूत सुरक्षाविषयक उपाययोजनांची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने होत असल्याची खंतही खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केली.

यावर उपाय म्हणून सर्व १२ डब्यांच्या लोकलचे टप्प्याटप्प्याने १५ डब्यांच्या लोकलमध्ये रूपांतर करावे, सर्व रेकमध्ये ऑटो-डोअर क्लोजिंग सिस्टीम अनिवार्य करावी तसेच स्थानकांवरील गर्दी व्यवस्थापनासाठी स्वतंत्र निगराणी यंत्रणा उभारावी, अशी मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत केली. भविष्यात अशा दुर्दैवी मृत्यूंना आळा घालण्यासाठी या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचेही खासदार नरेश म्हस्के यांनी स्पष्ट केले.



## संपादकीय

### विझिंजम बंदर : स्वावलंबन, आर्थिक समृद्धी आणि सामरिक वर्चस्वाची आकांक्षा

दररोज शेकडो मालवाहू जहाजे भारताच्या दक्षिण किनारपट्टीजवळून जगभरात मालाची वाहतूक करत जातात. तरीही, कित्येक दशके भारताचा बहुतांश आयात-निर्यात माल कोलंबो, सिंगापूर आणि पोर्ट क्लांगसारख्या परदेशी बंदरांवरूनच वळवला जात होता. यामुळे मालवाहतुकीचा खर्च तर वाढायचाच, शिवाय भारतीय मालाच्या हाताळणीतून मिळणारा महसूलही इतर देशांच्या पदरात पडायचा. हेच चित्र बदलण्यासाठी विझिंजम आंतरराष्ट्रीय सागरी बंदर उभारण्यात आले. केरळमधील तिरुवनंतपुरमजवळ असलेले हे बंदर जगातील सर्वात मोठ्या मालवाहू जहाजांची हाताळणी करण्यासाठी आणि भारताला जागतिक सागरी व्यापारात एक प्रमुख केंद्र म्हणून प्रस्थापित करण्यासाठी डिझाइन केलेले, देशातील पहिलेच खोल समुद्रातील कंटेनर ट्रान्स-शिपमेंट बंदर आहे. मात्र, इतके धोरणात्मक महत्त्व असूनही, हा प्रकल्प केरळमध्ये राजकीय वादाचा केंद्रबिंदू बनला आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी या बंदराची मालकी, त्याचे संचालन आणि भविष्यातील विस्ताराबाबत चिंता व्यक्त केली आहे. विझिंजम आंतरराष्ट्रीय बंदर हा भारताच्या 'सागरमाला' उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. केरळ सरकार आणि 'अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन' (APSEZ) यांच्यातील सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून (PPP) डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट अँड ट्रान्सफर (DBFOT) या मॉडेलअंतर्गत या बंदराचा विकास करण्यात आला आहे. भारताचे जागतिक सागरी व्यापारासाठीचे महाद्वार म्हणून या बंदराकडे पाहिले जाते. हे बंदर प्रामुख्याने कंटेनर ट्रान्सशिपमेंटची (कंटेनर्स एका जहाजातून उतरवून दुसऱ्या जहाजावर चढवणे) हाताळणी करण्यासाठी डिझाइन केले गेले आहे. विझिंजममुळे अवाढव्य मालवाहू जहाजे थेट भारतीय बंदरावर नांगर टाकू शकतील. त्यामुळे परदेशी बंदरांमधील ट्रान्सशिपमेंट केंद्रांवरील आपले अवलंबित्व कमी झाले असून जागतिक जलवाहतुक क्षेत्रातील भारताचे स्थान अधिक भक्कम झाले आहे. भारत ही जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि देशाच्या एकूण व्यापारापैकी तब्बल ९५% व्यापार हा सागरी मार्गाने होतो. तरीही, कित्येक दशकांपासून भारताकडे जागतिक दर्जाचे एकही ट्रान्स-शिपमेंट केंद्र नव्हते. परिणामी, भारताचा ८५% पेक्षा जास्त कंटेनर माल पारंपारिकपणे कोलंबो, सिंगापूर आणि पोर्ट क्लांगसारख्या परदेशी बंदरांमार्फत वळवला जायचा. तेथे हे कंटेनर जागतिक प्रवासासाठी मोठ्या जहाजांमध्ये चढवले जायचे. त्यामुळे लॉजिस्टिकचा खर्च वाढायचा, प्रवासाचा वेळ लांबायचा आणि भारतीय माल हाताळून कमाई करण्याची संधी परदेशी बंदरांना मिळायची. भारताचे स्वतःचे ट्रान्सशिपमेंट केंद्र असल्यास, भारतीय बंदरांची या मालापोटी परदेशात जाणारी वर्षाला २०० ते २२० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त बचत होऊ शकते. परदेशी केंद्रांवरील या अवलंबित्वामुळेतेथील वाहतूक कोंडी, भू-राजकीय धोके आणि पुरवठा साखळीतील अडथळे यांना भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार बळी पडतो. भारताची निर्यात सातत्याने वाढत असल्याने, हे अवलंबित्व कमी करणे ही आर्थिक आणि धोरणात्मक या दोन्ही दृष्टीने काळाची गरज बनली आहे. विझिंजम आंतरराष्ट्रीय सागरी बंदराचा उद्देश हाच अनुशेष भरून काढणे हा आहे. ट्रान्सशिपमेंटचे काम पुन्हा भारतीय किनाऱ्यावर आणून लॉजिस्टिकचा खर्च कमी करणे आणि जागतिक सागरी व्यापारात भारताचे स्थान अधिक मजबूत करणे, हे या बंदराचे ध्येय आहे. धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे स्थान हे विझिंजमचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. युरोप, मध्य पूर्व आणि पूर्व आशियाला जोडणाऱ्या जगातील सर्वात गजबजलेल्या 'पूर्व-पश्चिम' सागरी व्यापार मार्गापासून हे बंदर अवघ्या १० ते १६ सागरी मैलांच्या (Nautical Miles) अंतरावर आहे. दररोज शेकडो कंटेनर जहाजे भारताच्या या दक्षिण किनारपट्टीजवळून जातात. त्यामुळे आपल्या मूळ मार्गापासून अगदी थोडे अंतर पर करून ही जहाजे विझिंजमला सहज येऊ शकतात. हे वैशिष्ट्य जगातील मोजक्याच बंदरांकडे आहे. या बंदराला २० ते २४ मीटरची नैसर्गिक खोल किनारपट्टी (Deep Draft) लाभली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गाळ उपसण्याची (Dredging) गरज न पडता 'मेगामॅक्स' आणि 'अल्ट्रा लार्ज कंटेनर व्हेसल्स' (ULCVs) सारखी जगातील इथे सहज नांगर टाकू शकतात. किनाऱ्यावर कमी साचणारा गाळ, अत्यंत स्वयंचलित माल-हाताळणी यंत्रणा आणि टप्प्याटप्प्याने होणाऱ्या विस्ताराद्वारे ६.२ दशलक्ष TEUs पर्यंतचे नियोजित क्षमता-उद्दिष्ट, या सर्वांमुळे विझिंजम हिंद महासागरातील सर्वात आधुनिक ट्रान्सशिपमेंट बंदरांपैकी एक बनण्याच्या मार्गावर आहे. (१ TEU म्हणजे २० फूट लांबीच्या एका प्रमाणित मालवाहू कंटेनरचे आकारमान. यावरून विझिंजम बंदरासाठी किती अवाढव्य क्षमतेचे नियोजन केले जात आहे, याची कल्पना कोणीही करू शकते.) विझिंजमचे भौगोलिक स्थान भारताला तीन प्रमुख आर्थिक क्षेत्रांच्या केंद्रस्थानी आणून बसवते. पश्चिमेकडे, हे बंदर ऊर्जा-समृद्ध मध्य पूर्वेशी थेट संपर्क प्रदान करते. हा भाग भारताच्या सर्वात मोठ्या व्यापार भागीदारांपैकी एक आहे. हे बंदर होर्मुझची सामुद्रधुनी आणि बाब-अल-मंदेब यासारख्या सागरी अडथळ्यांच्या क्षेत्रांच्या (chokepoints) बाहेर वसलेले असल्याने पश्चिम आशियातील भू-राजकीय अनिश्चिततेच्या काळात जहाजांच्या कंपन्यांना एक उत्तम पर्याय उपलब्ध होतो. त्याशिवाय, इथे प्रस्तावित बंकरिंग (इंधन पुरवठा) आणि द्रव मालाची साठवणूक सुविधा, हिंद महासागरातून प्रवास करणाऱ्या जहाजांसाठी सर्व्हिसिंग हब म्हणून या बंदराची भूमिका अधिक मजबूत करते. त्याशिवाय या बंदरापासून अरबी समुद्राच्या पार पूर्व आफ्रिकेतील केनिया, टांझानिया आणि मोझांबिकसारखे देश भारताचे महत्त्वाचे व्यावसायिक भागीदार म्हणून उदयाला येत आहेत. विझिंजम ज्या स्थानी आहे तेथे शिपिंग कंपन्यांना थेट पूर्व आफ्रिकन बंदरांमध्ये पोहोचण्यापूर्वी दक्षिण आशिया आणि पूर्व आशियातील माल एकत्र (consolidate) करणे सोयीचे ठरेल. त्यामुळे आफ्रिकन खंडासोबत भारताचे वाढते संबंध दृढ होत असतानाच कार्यक्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते. पूर्व दिशेला, हे बंदर जगातील सर्वात गजबजलेल्या सागरी मार्गांपैकी एक असलेल्या मलाक्काच्या सामुद्रधुनीद्वारे आग्नेय आशियाशी भारताचे दळणवळण मजबूत करते. पूर्व भारत, बांगलादेश आणि म्यानमारमधून येणारा माल इतर स्पर्धक परदेशी ट्रान्स-शिपमेंट केंद्रांवरून वळवण्याऐवजी विझिंजम येथे एकत्र केला जाऊ शकतो. यामुळे हे बंदर भारताच्या व्यापारासाठी आणि इंडो-पॅसिफिक रणनीतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या तीन क्षेत्रांच्या केंद्रस्थानी (crossroads) येऊन ठाकले आहे. विझिंजम कोलंबो किंवा सिंगापूरसारख्या बंदरांची जागा घेण्यासाठी विकसित करण्यात येत नाही. त्याचे कार्य संपूर्ण दक्षिण आशियाचे सागरी जाळे मजबूत करणे हे आहे. विझिंजमचे जगातील सर्वात गजबजलेल्या सागरी मार्गांजवळचे मोक्याचे स्थान, तेथील आधुनिक पायाभूत सुविधा आणि जलद माल हाताळणी यांमुळे जहाजांचा वेळ आणि खर्च वाचेल. त्यामुळे जागतिक व्यापारात भारताला अधिक महत्त्वाची भूमिका मिळते. ग्रेट निकोबारमधील प्रस्तावित 'गॅलेथिया बे' ट्रान्सशिपमेंट बंदरासोबतच, विझिंजम हा प्रकल्प जागतिक दर्जाच्या बंदरांचे एक भक्कम जाळे उभारण्याच्या भारताच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग आहे.

# मतदारयाद्यांच्या सुधारित एसआयआर कार्यक्रमांतर्गत आता 17 ऑगस्टपर्यंत दाखल करता येतील अर्ज

मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR - Special Intensive Revision) 30 जूनपासून सुरू असून त्या अंतर्गत गणनाअर्ज दाखल करण्याची मुदत 8 ऑगस्टपर्यंत होती. त्यास भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मुदतवाढ जाहीर करण्यात आलेली असून आता मतदार 17 ऑगस्ट 2026 पर्यंत आपले गणनाअर्ज संबंधित मतदार यादी भाग क्रमांकाच्या मतदान केंद्र अधिकारी (BLO) यांचेकडे जमा करू शकतात. दि. 1 ऑक्टोबर 2026 या पात्रता दिनांकाच्या अनुषंगाने मतदार यादीचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरू असून 30 जूनपासून बीएलओंमार्फत गणनाप्रपत्रे वितरण, संकलन आणि डिजीटलायझेशनचे काम सुरू आहे. या कामास नवीन सुधारणा परिपत्रकान्वये आता 17 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून मतदान केंद्रांचे पुनर्रचनाकरण आणि पुनर्व्यवस्थापन कामही 17 ऑगस्टपर्यंत पूर्ण करावयाचे आहे. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्यामार्फत एसआयआर कामावर बारकाईने लक्ष दिले जात आहे.



सुधारित वेळापत्रकानुसार प्रारूप मतदार यादीचे प्रकाशन 24 ऑगस्ट 2026 पर्यंत करावयाचे असून याबाबत दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी 24 ऑगस्ट ते 23 सप्टेंबर 2026 असणार आहे तसेच तसेच प्राप्त दावे व हरकतींची नोटीस प्रक्रिया आणि निकाली काढणे कालावधी 24 ऑगस्ट ते 22 ऑक्टोबर 2026 हा असणार आहे. अंतिम मतदार यादी 27 ऑक्टोबर 2026 रोजी प्रकाशित करण्यात येणार आहे.

आजपर्यंत 150 ऐरोली विधानसभा मतदारसंघात 4,97,380 मतदारांपैकी 4,59,153 गणनाप्रपत्रांचे वितरण झालेले असून 2,23,808 गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओंकडे माहिती भरून जमा करण्यात आलेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे. . यामध्ये सर्वात महत्वाची बाब म्हणजे नागरिकांना गणनापत्रे दाखल करण्यासाठी आता 17 ऑगस्ट 2026 पर्यंतचा कालावधी असून आपली गणनापत्रे बीएलओंकडे माहिती भरून जमा केली नाही तर त्या नागरिकाचे नाव प्रारूप मतदार यादीतून वगळले जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी सन 2002 च्या यादीत आपला वा आपल्या पालकांच्या नावाचा तपशील सापडला नाही तरीही फक्त गणनापत्राच्या कॉलम 3 मध्ये आपली सध्याची माहिती भरून व स्वाक्षरी करून त्यासोबत आयोगाने जाहीर केलेल्या कागदपत्रांपैकी एक कागदपत्र जोडून आपले गणनाप्रपत्र (Enumeration Form) आपल्या भागातील बीएलओ यांच्याकडे जमा करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा आपले नाव प्रारूप यादीतून वगळण्यात येईल व पुन्हा मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म 6 सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करून नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागणार आहे, याची नोंद घ्यावी.

नागरिकांच्या सोयीसाठी आपल्या मतदार यादी भाग क्रमांकाचे बीएलओ कोण आहेत याची माहिती - 150 ऐरोली करिता https://www.facebook.com/share/p/1DWA4rSkHv/ या लिंकवर तसेच 151 बेलापूर करिता https://www.facebook.com/share/p/19FVzXaDvf/ या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तरी आपला मतदानाचा घटनेने दिलेला अधिकार अबाधित राखण्यासाठी गणनाप्रपत्रे गणनापत्र (Enumeration Form) भरून बीएलओंकडे देणे व त्याचे डिजिटलायझेशन होणे आवश्यक असल्याचे लक्षात घेत 17 ऑगस्टपर्यंत न थांबता गणनाप्रपत्र आजच दाखल करावे असे आवाहन अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा नमुंमपा अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांनी केले आहे.

# नागरिकांशी थेट संवादासाठी जिल्हा परिषद, ठाणेचे अधिकृत Public App खाते सुरू

## शासनाच्या योजना व विकासकामांची अधिकृत माहिती आता एका क्लिकवर

नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध योजना, विकासकामे, जनजागृती मोहिमा तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची अधिकृत आणि अद्ययावत माहिती अधिक वेगाने, पारदर्शकपणे व विश्वासार्ह पद्धतीने पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद, ठाणेचे अधिकृत Public App खाते सुरू करण्यात आले आहे.

डिजिटल माध्यमांचा वाढता वापर लक्षात घेऊन नागरिकांना अधिकृत माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा परिषद, ठाणेने Public App या लोकप्रिय डिजिटल व्यासपीठावर आपली उपस्थिती नोंदविली आहे. या माध्यमातून विविध विभागांच्या शासकीय योजना, विकासकामे, प्रेसनोट, जनजागृती मोहिमा, आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास, समाजकल्याण, महिला व बालविकास, पाणीपुरवठा, कृषी तसेच इतर विभागांच्या महत्त्वपूर्ण सूचना, निविदा, यशोगाथा आणि आपत्कालीन परिस्थितीतील आवश्यक माहिती नियमितपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेच्या अधिकृत Public App खात्यामुळे नागरिकांना शासनाच्या योजनांची माहिती वेळेत मिळणार असून विविध उपक्रमांबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल. तसेच अधिकृत स्रोतावरून माहिती उपलब्ध होत असल्याने अफवा किंवा अप्रमाणित माहितीवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.

जिल्हा परिषद, ठाणेने नागरिकांशी अधिक प्रभावी, पारदर्शक आणि गतिमान संवाद साधण्यासाठी अधिकृत Public App खाते सुरू केले असून, यापूर्वीपासून कार्यरत असलेल्या Facebook, Instagram, YouTube आणि X (Twitter) या अधिकृत सोशल मीडिया खात्यांसह आता Public App द्वारेही शासनाच्या विविध योजना, विकासकामे, प्रेसनोट, जनजागृती मोहिमा, महत्त्वाच्या सूचना, आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची अधिकृत व अद्ययावत माहिती नागरिकांपर्यंत अधिक वेगाने पोहोचविण्यात येणार आहे. नागरिकांनी शासनाच्या योजना आणि जिल्हा परिषदेच्या उपक्रमांची विश्वासार्ह व अधिकृत माहिती मिळविण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणेच्या Public App तसेच Facebook, Instagram, YouTube आणि X (Twitter) वरील अधिकृत खात्यांना Follow करून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषद, ठाणेच्या जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे यांनी केले आहे.

जिल्हा परिषद, ठाणेचे अधिकृत Public App खाते Follow करण्यासाठी लिंक :

https://public.app/deeplink/user/z9yiaMtGUvTcZYBRAiPC049PM5Z2

"डिजिटल माध्यमांच्या युगात नागरिकांपर्यंत शासनाची माहिती जलद, अचूक आणि विश्वासार्ह पद्धतीने पोहोचणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जिल्हा परिषद, ठाणेचे अधिकृत Public App खाते हे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी महत्त्वाचे माध्यम ठरेल. शासनाच्या विविध योजना, विकासकामे आणि लोकहिताच्या उपक्रमांची माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत वेळेत पोहोचावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. नागरिकांनी अधिकृत Public App खाते Follow करून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा आणि अधिकृत माहितीचाच स्वीकार करावा."

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रणजित यादव**

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

## पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले. प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता.

अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**रामेश्वर नाईक - कक्ष प्रमुख**
**मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष**

# अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांकरीता शासकीय निवासी शाळा, चिखलोली येथे सहाय्यक शिक्षक या पदासाठी भरती

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभागांतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात ठाणे जिल्हयात सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त अनुसूचित जाती व नवबौध्द मूलांकरिता शासकिय निवासी शाळा, चिखलोली, अंबरनाथ येथे नवीन शासकीय निर्वासी शाळा सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. येथे इयत्ता ६ वी ते १० वी साठी तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर ६ महिने किंवा नियमित शिक्षक हजर होईपर्यंत खालील विषयांकरिता तासिका तत्वावर सहाय्यक शिक्षक या पदासाठी पात्र व उत्सुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे नाव - प्राथमिक शिक्षक इ. ६ वी ते ८ वी - शैक्षणिक पात्रता - Hsc/B.A./B.Sc./D.Ed (TET प्राधान्य), विषय - सर्व विषय, आवश्यक पद संख्या - 4.

पदाचे नाव - सहाय्यक शिक्षक (माध्यमिक) - शैक्षणिक पात्रता - B.A.B.Ed, विषय - इंग्रजी + सामाजिक शास्त्र, आवश्यक पद संख्या - 1.

पदाचे नाव - सहाय्यक शिक्षक (माध्यमिक) - शैक्षणिक पात्रता - B.A.B.Ed, विषय - हिंदी+मराठी+ सामाजिक शास्त्र, आवश्यक पद संख्या - 1.

अटी व शर्ती :-

1. सदर पदावर घडयाळी तासिकाप्रमाणे सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग यांचे शासन निर्णय क्र.सकआ/२०१३/प्र. क्र.३०५/२०१३/आस्था-२ दि.३०.११.२०१३ नुसार मानधन देय राहील. सदर एकत्रित मानधना व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.
2. उमेदवारांची निवड करतांना अनुभव तसेच TET परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
3. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलविण्याकरिता पात्र असणार नाही.
4. सदर पदे मानधन/तासिका तत्वावर असून, भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी जास्ती करणे, भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे अटी व शर्तीमध्ये बदल करणे, सदरील पदे कधीही कोणतेही कारण न देता समाप्त करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे यांनी राखून ठेवलेले आहेत.
5. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/शानिशा/शै.वर्ष २०२६-२७/सुचना/का.५/२६-२७/१७४०, दि.२८/०४/२०२६ नुसार निवड झालेल्या उमेदवारांकडून करारनामा करणे बंधनकारक राहील.

पात्र व इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज बातमीत नमूद केल्याप्रमाणे Bio-Data/ Resume आवश्यक शैक्षणिक अर्हताचे कागदपत्रे सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन 4 था मजला, दत्त वाडी, स्वामी समर्थ मठासमोर कळवा, जि. ठाणे येथे दि.17/8/2026 ते 31/08/2026 पर्यंत (शासकीय सुट्टया सोडून) अर्ज सादर करावेत, असे ठाणे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे यांनी कळविले आहे.

# मतदारयादीत नाव राहण्यासाठी 8 ऑगस्टपर्यंत बीएलओंकडे गणनापत्रे दाखल करणे गरजेचे

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील 150 ऐरोली आणि 151 बेलापूर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचा (SIR - Special Intensive Revision) सविस्तर आढावा ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी रविवारी घेतल्यानंतर एसआयआर कामास वेग आलेला आहे. मागील दोन्ही शनिवार व रविवारी सुट्ट्यांच्या दिवशी 173 ठिकाणी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. त्याठिकाणी त्या त्या भाग क्रमांकाचे मतदान केंद्र अधिकारी (BLO) उपस्थित होते. नागरिकांनी याठिकाणी आपल्या भाग क्रमांकाच्या बीएलओंची भेट घेऊन गणनापत्रे (Enumeration Form) घेणे व त्यामध्ये आवश्यक माहिती भरून त्यांच्याकडे देणे सोयीचे झाले. या विशेष कॅम्पला नागरिकांचा उत्साही प्रतिसाद लाभला.

150 ऐरोली विधानसभा मतदारसंघात 4,97,380 मतदारांपैकी 4,48,147 गणनापत्रांचे वितरण झालेले असून 2,15,725 गणनापत्रे मतदारांकडून बीएलओंकडे माहिती भरून जमा करण्यात आलेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे.

त्याचप्रमाणे, 151 बेलापूर विधानसभा मतदारसंघातील 4,22,317 मतदारांपैकी 4,07,828 गणनापत्रांचे वितरण झालेले असून 2,10,759 गणनापत्रे मतदारांकडून बीएलओंकडे आवश्यक माहिती भरून जमा झालेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे. यामध्ये सर्वात महत्वाची बाब म्हणजे नागरिकांना गणनापत्रे दाखल करण्यासाठी 8 ऑगस्ट 2026 पर्यंतचा कालावधी असून आपली गणनापत्रे बीएलओंकडे माहिती भरून जमा केली नाही तर त्या नागरिकाचे नाव प्रारूप मतदार यादीतून वगळले जाणार आहे. त्यामुळे मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म 6 सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करून पुन्हा नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आपली गणनापत्रे (Enumeration Form) सन 2002 च्या यादीतील आपला वा आपल्या पालकांच्या नावाचा तपशील सापडला नाही तरी गणनापत्राच्या कॉलम 3 मध्ये सध्याची माहिती भरून व स्वाक्षरी करून आपल्या बीएलओ यांच्याकडे जमा करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा आपले नाव प्रारूप यादीतून वगळण्यात येईल याची नोंद घ्यावयाची आहे.

आपल्या मतदार यादी भाग क्रमांकाचे बीएलओ कोण आहेत याची माहिती 150 ऐरोली करिता https://www.facebook.com/share/p/1DWA4rSkHv/ या लिंकवर तसेच 151 बेलापूर करिता https://www.facebook.com/share/p/19FVzXaDvf/ या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. 'कोणतीही पात्र व्यक्ती मतदार यादीतून वगळली जाणार नाही आणि कोणत्याही अपात्र व्यक्तीचा मतदार यादीत समावेश असणार नाही' हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अर्थात एसआयआर सुरू आहे.

हे दैनिक मालक, प्रकाशक दीपक महिपत दळवी यांनी एआईएस प्रिटिंग सोल्यूशंस, प्लॉट नं. ए-५४४, टीटीसी इंडस्ट्रिअल एरिया, ठाणे बेलापूर रोड, महापे, नवी मुंबई ४०० ७०९ (मुद्रक) येथे छापून आणि २२/००१, कल्पवृक्ष गार्डन सी. एच. एस. एल., हायलँड रेसिडन्सी समोर, बाळकूम-ढोकाळी रोड, ढोकाळी, ठाणे (पश्चिम) ४००६०८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपादक : दीपक महिपत दळवी MAHMAR / 2000 / 3093

## वेचक

### ठाण्यात प्रथमच ज्येष्ठ पत्रकार व आंतरराष्ट्रीय वक्ते पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे जाहीर व्याख्यान

**ठाणे :** स्वातंत्र्याच्या अमृतकालातील ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त *आशीर्वाद फाऊंडेशन, ठाणे* यांच्या वतीने "राष्ट्रजागृती : आव्हाने, समाधान आणि सनातन धर्म" या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानासाठी देशभरातील लाखो श्रोत्यांमध्ये लोकप्रिय असलेले ज्येष्ठ पत्रकार, आंतरराष्ट्रीय वक्ते आणि राष्ट्रवादी विचारवंत श्री. पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ११.०० वाजता, गडकरी रंगायतन, ठाणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

आजच्या बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रजागृती, सनातन मूल्यांचे जतन आणि समाजासमोरील विविध आव्हानांवर श्री. पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ मार्गदर्शन करणार आहेत. ठाणेकरांसाठी त्यांचे हे व्याख्यान एक विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी पर्व ठरणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून प्रवेश कार्यक्रम पूर्णतः विनामूल्य आहे. आसनव्यवस्था मर्यादित असल्याने "प्रथम नोंदणी – प्रथम प्रवेश" या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल. नोंदणीसाठी पोस्टरवरील QR Code स्कॅन करावा किंवा आयोजकांशी ह्या नंबर वरती 9920693355 / 8591650906 संपर्क साधावा. याबाबत माहिती देताना आशीर्वाद फाऊंडेशनच्या संस्थापिका सौ. अश्विनी पटवर्धन यांनी ठाणे व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्था तसेच राष्ट्रहित आणि भारतीय संस्कृतीबद्दल आस्था असलेल्या सर्व नागरिकांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

### जिल्हा माहिती कार्यालयातील जुन्या टाटा सुमो विक्टा वाहन निर्लेखनासंबंधी इच्छुकांनी निविदा सादर करण्याचे आवाहन

**ठाणे :** जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे येथील टाटा सुमो विक्टा वाहन क्र.एम.एच.-04-एएन-3436 हे वाहन नादुरुस्त / निकामी वाहन जसे आहे तसेच निर्लेखित करण्यात येणार आहे. हे वाहन निर्लेखित करण्यासाठी या कार्यालयामार्फत या अगोदरही बातमी काढण्यात आली होती, परंतु वेळेत निविदा प्राप्त न झाल्यामुळे दरपत्रके सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी इच्छुकांनी जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे येथे दि.10 ऑगस्ट 2026 पर्यंत निविदा सादर करण्यात यावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी ठाणे मनोज सुमन शिवाजी सानप यांनी केले आहे. कार्यालयाच्या आवारातून खरेदी करावयाच्या शर्ती नुसार विक्री करावयाचे आहे. हे वाहन विक्रीने घेण्यापूर्वी शनिवार, रविवार व इतर सार्वजनिक शासकीय सुट्टींचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत पाहाण्यास उपलब्ध आहे. नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही. सादर केलेल्या निविदा मंजूर करणे अगर नामंजूर करणे या बाबतचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी ठाणे यांच्या स्वाधिन राहतील. इच्छुकांनी कार्यालयीन वेळेत जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे यांच्याशी संपर्क साधून आपल्या निविदा सादर कराव्यात.

### ऐतिहासिक जंजिरे वसई किल्ला व परिसरात वसई-विरार महानगरपालिकेची विशेष स्वच्छता मोहीम



**वसई विरार :** शहर महानगरपालिकेचे महापौर अजीव पाटील व आयुक्त पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वसई-विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या जंजिरे वसई किल्ला व परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. मागील १० दिवसांपासून सुरु असलेल्या या स्वच्छता मोहिमेत महानगरपालिका प्रभाग समिती 'आय' घनकचरा विभागाच्या मुख्य आरोग्य निरीक्षक प्रविणा कदम व कनिष्ठ आरोग्य निरीक्षक उमेश आडे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागातील स्वच्छता दूतांमार्फत नियोजनबद्ध पद्धतीने किल्ला व परिसर साफसफाईची कामे करण्यात आली. आज सकाळी ७ ते दुपारी १ यावेळेत एकूण १५ कर्मचारी वर्गाने विशेष स्वच्छता मोहीम राबवून जंजिरे वसई किल्ल्याचा बंदर दर्या दरवाजा, हनुमंत मंदिर परिसर, बंदर विहीर आवार, धान्य कोठार परिसर, चौकी परिसर अत्यंत जिद्दीने झाडीतून मोकळा केला. यावेळी मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या काटेरी झुडुपे, अनावश्यक झाडी, गवत, वेली यांची स्वच्छता करण्यात आली. येथील मुख्य वास्तूला, पुरातत्वीय रचनेला, बांधकामाला कोणत्याही प्रकारची इजा न करता आज संवर्धनासाठी सर्वोत्तम योगदान देण्यात आले. आजच्या विक्रमी स्वच्छता मोहिमेने पर्यटकांना स्थळांचे दर्शन होणे व मुक्त संचार करणे सोपे झाले आहे.

# ४० हजार कोटींची बिल थकीत

## महाराष्ट्र राज्य गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनचा आंदोलनाचा इशारा

**पालघर :** महाराष्ट्र शासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे व 'टक्केवारी' पद्धतीमुळे राज्यातील ठेकेदारांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. राज्याच्या तिजोरीचे कुठल्याही प्रकारचे आर्थिक नियोजन न करता केवळ टक्केवारीसाठी हजारो कोटींची कामे ठेकेदारांना वाटप केली. त्यामुळे ही कामे पूर्ण केल्यानंतर ठेकेदारांना बिलं द्यायला शासनाकडे पैसे नाहीत, अशी गंभीर परीस्थीती शासनावर ओढवली आहे. एकूण ४० हजार कोटींपेक्षा जास्त देणी थकल्याने ठेकेदार आंदोलनाच्या पवित्र्यामधे आहेत.

महाराष्ट्र स्टेट गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशन ने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन दि. १५ ऑगस्ट पर्यंत बिलं न दिल्यास दि. १८ ऑगस्ट पासून मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत आंदोलन सुरू करू, असा इशारा दिला आहे.

शासनाकडे निधीची कमतरता असतानाही मंत्र्यांनी लोकप्रतिनिधींच्या शिफारशीवरून अव्वाच्या - सव्वा कामे मंजुर केली. भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या माध्यमातून टक्केवारी वसूल करून कामांचे वाटप केले. ठेकेदारांनी ही कामे पूर्ण केली मात्र गेल्या ३ वर्षापासुन ठेकेदारांना बिलंच मिळत नसल्याने ठेकेदार कर्जबाजारी झाले आहेत. त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. काही ठेकेदारांनी कर्जबाजारीपणामुळे मृत्यूलाही कवटाळले. त्यामुळे ठेकेदार संतप्त झाले आहेत.



**प्रलंबित बिलांसाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा**

ठेकेदारांच्या थकीत बिलांसाठी विशेष निधीची तरतूद करावी. प्रलंबित बिलांसाठी कालबद्ध कार्यक्रम आखुन त्यांचा तातडीने निपटारा करावा. भविष्यात पुन्हा असे होऊ नये, यासाठी दरवर्षी वास्तववादी तरतुद करावी. आदिवासी विभागाचा निधी इतरत्र वळवु नये.

ठेकेदार संघटनेने दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी आदिवासी विकास मंत्र्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले व ठेकेदारांची सध्याची अवस्था समजावून सांगितली. आदिवासी उपयोजनेतून डिसेंबर २०२४ पर्यंत १२००० कोटींची कामे ठेकेदारांनी पूर्ण केली होती. त्यापैकी आत्तापर्यंत फक्त १,६६० कोटींची बिल देण्यात आली तर उर्वरीत बिलं ही प्रलंबित आहेत. सार्वजनीक बांधकाम विभागाकडे सुमारे २०,००० कोटींपेक्षा जास्त तर जल जीवन योजनेअंतर्गत सुमारे १०,००० कोटींपेक्षा जास्त बिल थकीत आहेत. त्यामुळे ठेकेदार अडचणीत आले आहेत. ही थकीत बिलं तत्काळ देण्यात यावीत, अशी मागणी ठेकेदार संघटनेने केली आहे. आदिवासी उपयोजनेतील १० हजार कोटींची बिल थकीत असताना अर्थसंकल्पामधे मात्र तुटपुंजी तरतूद केली जाते. २०२४ - २५ मधे १,३८० कोटी, २०२५ - २६ मधे २८० कोटी तर २०२६ - २७ मधे ८०० कोटींची तरतुद केली होती. या तरतुदीने १० हजार कोटींच्या बिलांचे भुगतान करणे शक्य नाही. त्यामुळे अर्थसंकल्पामधे भरीव तरतुद करावी व ठेकेदारांना आर्थिक संकटापासुन वाचवावे अशी मागणी गेली तीन वर्ष ठेकेदार करत आहेत. दरम्यांत जुन्याच कामांची बिल थकीत असल्याने नवीन कामे ठप्प झाली आहेत. आदिवासी विभागाचा विकास थांबला आहे. विकास कामे सुरळीत व्हावीत , यासाठी बिल तत्काल अदा करावी, अशी मागणी संघटनेने निवेदनाने केली आहे.

**मुख्यमंत्र्यांनी कठोर भूमिका घ्यावी**

मंत्रालयामधे भ्रष्ट अधिकारी खुलेआम टक्केवारी घेऊन विकास कामांना आवश्यकता नसताना व निधीची कमतरता असतानाही प्रशासकीय मान्यता देतात. काही ठराविक मंत्रीही या टक्केवारीच्या खेळामधे सामील आहेत. त्यांच्यावर मुख्यमंत्र्यांनी अंकुश ठेवावा. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मंजूर केलेल्या कामांची चौकशी करावी.

# दिवा पोलीस स्टेशन कधी सुरू होणार ?

## इमारत तयार, तरीही नागरिकांना मुंब्र्याची वारी!

- **वाढती लोकसंख्या, गुन्हेगारी आणि अपुरे पोलीस बळामुळे दिवेकर त्रस्त**
- **रात्रीच्या वेळी तक्रार करण्यासाठी मोठी अडचण**

**दिवा (आरती परब) :** दिवा शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि त्याचबरोबर वाढणाऱ्या गुन्हेगारीच्या घटना लक्षात घेता दिवा येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. विशेष म्हणजे पोलीस स्टेशनसाठीची इमारत तयार असून, ठाणे महापालिकेकडून नुकतेच या इमारतीला OC (भोगवटा प्रमाणपत्र) मिळाले असल्याची माहिती आहे. मात्र, अद्याप पोलीस स्टेशन प्रत्यक्षात सुरू झालेले नसल्याने दिवेकर नाराजी व्यक्त करत आहे. सध्या दिव्यातील नागरिकांना तक्रार किंवा गुन्ह्याची नोंद करण्यासाठी मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये जावे लागते. दिवा ते मुंब्रा हा प्रवास विशेषतः रात्रीच्या वेळी नागरिकांसाठी मोठी अडचण ठरत आहे.

एखादी घटना रात्री उशिरा घडल्यास परिस्थिती आणखी गंभीर होते. रात्री १२ ते १ नंतर लोकल सेवा बंद होत असल्याने नागरिकांना तक्रार करण्यासाठी किंवा पोलिसांची मदत घेण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे स्वतंत्र दिवा पोलीस स्टेशन तातडीने सुरू करण्याची गरज निर्माण झाली आहे.



तसेच दिवा परिसरात घरफोडी, चोरीसह विविध गुन्ह्यांच्या घटना समोर येत आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत उपलब्ध पोलीस बळ अपुरे असल्याने पोलिसांवर मोठा ताण येत असल्याचे चित्र आहे. मनुष्यबळाची कमतरता असल्यास गुन्ह्यांचा तपास, घटनास्थळी पोहोचणे आणि पुढील कारवाई यामध्ये विलंब होण्याची शक्यता निर्माण होते.

दिवा परिसरासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरू झाल्यास नागरिकांना तक्रार नोंदवणे सोपे होईलच, शिवाय स्थानिक पातळीवर पोलीस यंत्रणा अधिक सक्षम होऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होईल. पोलीस स्टेशनची इमारत तयार असून OC देखील मिळाले असल्याची माहिती असताना प्रत्यक्ष पोलीस स्टेशन सुरू करण्यास विलंब का होत आहे? असा सवाल आता दिवेकरांकडून उपस्थित केला जात आहे.

दिव्याची वाढती लोकसंख्या, वाढते गुन्हे, अपुरे पोलीस बळ आणि रात्रीच्या वेळी नागरिकांना होणारी गैरसोय लक्षात घेता प्रशासनाने विलंब न करता दिवा पोलीस स्टेशन सुरू करावे, अशी मागणी दक्ष नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. आता प्रशासनाकडून याबाबत ठोस निर्णय कधी घेतला जातो आणि दिवा पोलीस स्टेशन प्रत्यक्षात कधी सुरू होते, याकडे संपूर्ण दिवेकरांचे लक्ष लागले आहे.

### कल्याण-डोंबिवली महापालिकेचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर!

**टिटवाळा :** टिटवाळ्यातील हरी ओम व्हॅली सोसायटीजवळील ओम संकुल परिसरातील विवेकानंद इंग्लिश हायस्कूलजवळ पालिका प्रशासनाने पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी शाळेच्या भिंतीलगत भला मोठा खड्डा खोदला आहे.

विशेष म्हणजे, लगतच गटार उपलब्ध असतानाही पावसाचे पाणी गटारात वळविण्याची कोणतीही योग्य उपाययोजना न करता रस्त्यालगतच हा धोकादायक खड्डा खोदण्यात आला आहे. त्यामुळे दररोज ये-जा करणारे शालेय विद्यार्थी, पालक आणि नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे.



एखादा विद्यार्थी, पालक किंवा नागरिक या खड्ड्यात पडून मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

याबाबत संबंधित अधिकारी हरून इनामदार यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता, "करतो... पाहतो... माणूस पाठवतो..." अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. मात्र प्रत्यक्षात अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिक नागरिकांची मागणी आहे की, हा धोकादायक खड्डा तात्काळ बुजवून सुरक्षित व्यवस्था करावी आणि कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांनी कठोर कारवाई करावी. नागरिकांचा सवाल "अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?"



**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सावंतवाडी रोड दरम्यान नियमित एक्सप्रेस ट्रेन सुरु करण्यास भारतीय रेल्वेने मंजुरी दिल्याबद्दल आज नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचा शिवसेना पक्षाच्या वतीने तसेच कोकण वासियांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी संसदीय गटनेते डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे, खासदार नरेश म्हस्के, महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, खासदार संजय दिना पाटील, खासदार श्रीरंग बारणे, खासदार ओम राजे निंबाळकर यावेळी उपस्थित होते. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि खासदार नरेश म्हस्के यांनी ही ट्रेन सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला होता. कोकण रेल्वे मार्गावर ही ट्रेन नियमित धावणार असून 22 स्थानकांवर ट्रेनला थांबा मिळाला आहे. या नवीन ट्रेन मुळे गणपतीमध्ये गावी जाणाऱ्या चाकरमान्यांची मोठी सोय होणार असून नियमित प्रवास करणाऱ्या कोकणवासीयांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे.**

### वक्त बोर्डाच्या राष्ट्रीय संयुक्त समितीचे अध्यक्ष खा. जगदंबिका पाल यांनी भिवंडीत येत शिवसेना जिल्हाप्रमुखांची घेतली भेट

**भिवंडी :** उत्तर प्रदेशचे खासदार तथा वक्त बोर्डाच्या राष्ट्रीय संयुक्त समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी नुकतीच शिवसेनेचे ठाणे ग्रामीण जिल्हाप्रमुख डॉ. देवानंद थळे यांच्या भिवंडी कशेळी गांव येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. त्यामुळे त्यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.मात्र अचानक भेटी साठी आलेल्या खासदारांमुळे पोलीस व शासकीय यंत्रणेची बंदोबस्त ठेवताना धावपळ उडाली होती.

शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांचे विश्वासू शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून ओळखले जाणारे देवानंद थळे यांच्या घरी अचानक पणे उत्तरप्रदेश येथील खासदार जगदंबिका पाल यांनी सदिच्छा भेट देऊन विकास कामा संदर्भात मौलिक चर्चा केली.यावेळी सरपंच वैशालीताई देवानंद थळे यांनी परिवाराच्यावतीन जोरदार स्वागत करण्यात आले. देवानंद थळे यांनी त्यांना विठ्ठल रखुमाईची आकर्षक मूर्ती देऊन त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन मनोभावे सत्कार केला. शिवसेना पक्षाकडे आकर्षित होऊन नुकत्याच



काही खासदारांनी एकनाथ शिंदे व खा.श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवेश केला त्यामुळे आता शिवसेना पक्षात येण्यासाठी बहुतांश आमदार व नगरसेवक सुद्धा इच्छुक झाले आहे,या प्रकारामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे असे असताना अचानक उत्तर प्रदेशातील खासदार जगदंअंबिका यांनी भिवंडीत येऊन शिवसेना जिल्हाप्रमुख थळे यांची भेट घेऊन गोपणीय चर्चा केल्याने ठाणे जिल्ह्यातील राजकीय पक्षांचे पदाधिकाऱ्यां मध्ये तर्क वितर्क व व चर्चा सुरू झाल्या आहेत.

## यू बिझनेस मिट यांच्यावतीने इंडो-थाई बिझनेस कॉरिडोरचे उद्घाटन

### क्रॉस बॉंड्री बिझनेस संधी प्राप्त करण्याकरिता आणखीन एक पाऊल

**बेलापूर :** यू बिझनेस मिट आणि संलग्न संस्थांच्या वतीने नुकतेच नवी मुंबई ग्लोबल समिट चे आयोजन करण्यात आले होते. या नावीन्यपूर्ण उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर यू बिझनेस मिट यांच्यावतीने इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर चे उदघाटन सोमवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी बेलापूर येथील बी आर एस सी सी एल येथे करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यवसाय संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रारंभ करण्यात आलेल्या संकल्पनेने मूर्त रूप धारण केले असून हे उदघाटन म्हणजे या संकल्पनेची पुढली पायरी मानली जात आहे.

यू बिझनेस मिट चे संस्थापक वैभव सोनटक्के यांनी आपले सहकारी समृद्धी वाणी, पत्रकार विवेक पाटील, पत्रकार मंदार दोंदे आणि संलग्न संस्थांचे प्रमुख यांच्या उपस्थितीत इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर ची निर्मिती केली आहे. एक्सपोर्ट इम्पोर्ट, मेडिकल टुरिझम, रिअल इस्टेट, ग्लोबल मिडिया, एंटरटेनमेंट इंडस्ट्री, मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री, क्लाऊड एंटरप्रेनरशिप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स



आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, बँकिंग अँड फायनान्स, कन्स्ट्रक्शन अशा नानाविध क्षेत्रातील होतकरू आणि विजिगीशू वृत्तीच्या व्यावसायिकांना थायलंड देशाबरोबर व्यवसाय करण्याकरता हे कॉरिडोर अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे असे वैभव सोनटक्के यांनी सांगितले.तसेच आगामी काळात मॉरिशस, दुबई आणि अमेरिका या देशांच्या समवेत क्रॉस बाउंड्री व्यवसाय करण्याकरता यू बिझनेस मीट पंख पसरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

इंटरनॅशनल बिझनेस कॉरिडोरचे उद्घाटन करत असतानाच यु बिझनेस मीट यांच्यावतीने कॉर्पोरेट बिझनेस सेंटर देखील सुरू करण्यात आले आहे. व्यवसाय संधी शोधणाऱ्या होतकरूंना अल्प शुल्कात कार्यालय या उपक्रमांतर्गत उपलब्ध करून देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय व्यवसाय करत असणाऱ्या होतकरूंना येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाताना लीगल ॲडव्हाइस, सरकारी परवाने, आंतरराष्ट्रीय व्यवसाय करार आदी महत्त्वपूर्ण दस्तावेज बनवण्याकरता यु बिझनेस मिटने पुढाकार घेतला आहे.

या उदघाटन सोहळ्याला निष्णात मानसोपचारतज्ञ आणि सेक्सोलॉजिस्ट डॉ राहुल भातांबरे,डॉ प्रियांका आशिष, सौंदर्य तज्ञ आणि फीजिओथेरपीस्ट,सेन्सिबल कनेक्ट सोल्युशन्स चे सर्वेसर्वा अमृत नेरळीकर,तेरणा हॉस्पिटलचे जनरल मॅनेजर डॉक्टर मनीष राय, यू बिझनेस मिट प्रतिनिधी केतकी पटवर्धन,जान्हवी पाटील,आय डी एफ सी बँकेचे पब्लिक रिलेशन्स आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स प्रतिनिधी.यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अवजड वाहन प्रवेशामुळे भिवंडीत वाहतूक कोंडीचा प्रश्न झाला गहन

### प्रवेश बंदी कायद्याची अंमलबजावणी करावी , वाहतूक पोलिस उपायुक्त यांना निवेदन

**भिवंडी :** भिवंडी शहर आणि अंजुरफाटा मानकोली,कशेळी व खारबाव परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्यामुळे प्रवासी नागरिकांसह नोकरदार वर्ग आणि शालेय विद्यार्थी,स्थानिक रहिवासी मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत.या वाहतूक कोंडी बाबतीत वाहतूक पोलीस योग्य पद्धतीने नियोजन करीत नाहीत तसेच या मार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनाची रेलचेल नियमबाह्य पद्धतीने सुरू असते त्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडी ला अवजड वाहन जबाबदार आहे.त्यांना सकाळी वर्दळीच्या वेळ असल्यामुळे प्रवेश बंदी करून कायद्याची अंमलबजावणी वाहतूक पोलिसांनी काटेकोरपणे करावी अशी मागणी भिवंडी महानगर पालिका नगरसेविका वनिता सुनील भगत यांनी केली आहे. याबाबत त्यांनी वाहतूक पोलिस उपाआयुक्त पंकज शिरसाठ यांची भेट घेऊन लेखी निवेदन दिले आहे.

भिवंडी शहर परिसरात वाहतुकीचे योग्य पद्धतीने नियोजन होत नसल्यामुळे



महापौर नारायण चौधरी यांनी वाहतूक पोलीस व पालिका अधिकाऱ्यांची संयुक्तरीत्या नुकतीच बैठक घेऊन वाहतूक सुरळीत करणे बाबत चर्चा केली तसेच नियोजित वेळेमध्ये अवजड वाहनांची वाहतूक शहरांमध्ये नको अशी सूचनाही महापौर चौधरी यांनी पोलिसांना दिली होती मात्र असे असताना शहरात मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वालचेल सुरू असल्यामुळे वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अवजड वाहनांना वर्दळीच्या सकाळी ८ ते रात्री ८ वाजताच्या वेळी प्रवेशबंदी असतानाही अंजूरफाटा व शहरातील मुख्यमार्गावर अवजड वाहनांना बेकायदेशीर प्रवेश दिला जात आहे. ज्यामुळे या मुंबई आग्रारोड मार्गांवर सदैव वाहतूक कोंडीचा सामना सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी,चाकरमानी,रुग्ण यांना करावा लागत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते सुनील भगत यांनी यावेळी दिली.

सदर मार्गावर वाहतूक पोलीस अवजड वाहन चालकां कडून मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण करून प्रवेश देत असल्याचाही तक्रार त्यांनी पोलीस उपायुक्तांकडे केली आहे.अनेक अवजड वाहनांची तपासणी नावाखाली त्याठिकाणी पावत्या फाडून प्रवेश देत आहेत.अंजूरफाटा चौकामध्ये वाहने रस्त्यावर थांबवून या पावत्यांची तपासणी केली जाते. सर्व सामान्य वाहन चालक वाहतूक नियमांचे पालन करूनही त्यांना वाहन कोंडी चा नाहक मनस्ताप त्रास सहन करावा लागत आहे.